"उद्या काही स्फोट होईल तर"; संतोष देशमुख हत्या प्रकरणी संभाजीराजेंचा फडणवीसांना इशारा >> पान 2

शरद पवार आमच्या सोबत आले तर आम्हाला फायदा होईल- रामदास आठवले >> पान 3

प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तबांखु व वाहनासह ७ लाखांचा मुद्देमाल जप्त; बिटरगाव पोलीस स्टेशनची कार्यवाही >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



चंकी पांडेमुळे भाजला होता या अभिनेत्रीचा पाय, तेव्हा अभिनेत्याला मारायचे होते सहकलाकाराला

आतील पान

**सुविचार**

यशासाठी प्रामाणिकपणा आणि सत्यता आवश्यक आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 124 ■ रविवार, दि. 15 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भातली अंतिम यादीवर दिल्लीत शिक्कामोर्तब, नागपुरात आज शपथविधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा उद्या (१५ डिसेंबर) नागपूरमध्ये विस्तार होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार शपथ घेतल्यानंतर दहा दिवसांनी राज्यातल्या मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. १९९१ नंतर प्रथमच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. उद्या दुपारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे नवीन मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ देतील. महायुतीच्या मंत्रिमंडळात भाजपचे २१, शिवसेनेचे १२, राष्ट्रवादीचे १० मंत्री असणार आहे, अशी सूत्रांची माहिती आहे.**

अशातच महायुतीच्या मंत्रिमंडळाची यादी संदर्भात महत्वाची माहीती समोर आली आहे. मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भातली नावांची यादी आता दिल्लीदरबारी गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता केवळ औपचारिकता असली तरी दुपारपर्यंत या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एकत्रित यादी दिल्लीत पाठवल्याची माहिती सूत्रांकडून मिळते आहे. तर दुपारनंतर मंत्रिपदावर वर्णी लागणाऱ्यांना संपर्क सुरु होणार असल्याचे देखील सांगण्यात येत आहे.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा उद्या नागपुरातील राजभवनात होणार आहे. मात्र मंत्रिमंडळ विस्तारात भाजप आणि शिवसेना हे दोन पक्ष त्यांच्या कोट्यातील काही मंत्रीपद रिक्त ठेवू शकतात अशी शक्यता आहे. दोन्ही पक्षात मंत्री पदासाठी इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे दोन्ही पक्षांकडून काही मंत्रीपद रिक्त ठेवले जाऊ शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दरम्यान राजभवनात मंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी तयारीला सुरुवात झाली आहे. उद्या संध्याकाळी चार वाजता हा शपथविधी सोहळा राजभवनातील लॉनवर होण्याची शक्यता आहे. एवढ्या मोठ्या संख्येने मंत्र्यांच्या शपथविधीसाठी राजभवनात तेवढ्या क्षमतेचा सभागृह नाही, त्यामुळे राजभवनाच्या लॉनवर शपथविधी सोहळा होऊ शकेल अशी शक्यता आहे.

नागपूरमध्ये उद्या होणाऱ्या मंत्री मंडळ विस्तारात शपथ घेणारे संभाव्य मंत्री अधिकृत फोनच्या प्रतिक्षेत असल्याची माहिती पुढे आली आहे. तर शिवसेनेत अनेक नेत्यांची मंत्री पदासाठी लॉबिंग सुरू असल्याचेही चित्र आहे. शुक्रवारी रात्री अनेक इच्छुक शिंदेंच्या भेटीला दाखल झाले होते. यात प्रामुख्याने संजय शिरसाट, योगेश कदम, विजय शिवतारे, तानाजी सावंत, दिपक केसरकर यांच्या नावाचा समावेश आहे. शिवसेनेच्या यादीत यंदा अनपेक्षित असा बदल पहायला मिळेल, अशी ही चर्चा आहे. तर नवीन चेर्हयांना यंदा शिवसेनेत प्राधान्य दिले जाणार असल्याचे कळते आहे. तर अकार्यक्षम आणि वाचाळवीरांना शिंदोंकडून नारळ दिला जाणार असल्याची माहिती पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी दिली आहे. मंत्रीमंडळ विस्तारासाठी एक दिवस बाकी असताना इच्छुक आमदार वर्षा आणि सागरचे उंबरठा झिजवताना पहायला मिळत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: संभाव्य मंत्र्यांना फोन करणार आहेत. मंत्रिमंडळ विस्ताराबाबत देवेंद्र फडणवीस भाजपच्या संभाव्य मंत्र्यांना फोन करून उपस्थित राहण्याच्या सूचना करणार असल्याची माहिती समोर आली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या फोननंतरच मंत्रिपदांवर शिक्कामोर्तब होईल. याचदरम्यान, भाजपच्या संभाव्य मंत्र्यांची यादी समोर आली आहे.




### भाजपच्या संभाव्य मंत्र्याची यादी

कोकण–
१. रविंद्र चव्हाण
२. नितेश राणे

मुंबई
१. मंगलप्रभात लोढा
२. आशिष शेलार
३. अतुल भातखळकर

पश्चिम महाराष्ट्र
१. शिवेंद्रसिंहराजे भोसले
२. गोपीचंद पडळकर
३. माधुरी मिसाळ
४. राधाकृष्ण विखे पाटील

विदर्भ
१. चंद्रशेखर बावनकुळे
२. संजय कुटे

उत्तर महाराष्ट्र
१. गिरीश महाजन
२. जयकुमार रावल

मराठवाडा
१. पंकजा मुंडे
२. अतुल सावे

## १० कोटींच्या सोन्यासह दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महसुल गुप्तवार्ता संचलनालयाने (डीआरआय) मुंबई एअर कार्गो संकुलात केलेल्या कारवाईत डीजे लाइटमध्ये १२ किलो सोने सापडले. त्याची किंमत सुमारे १० कोटी रुपये असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. या तस्करीमागे सराईत टोळी असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई एअर कार्गो संकुलामधील डीजे लाइटमध्ये सोने लपवले असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. त्या माहितीच्याआधारे डीआरआयने एअर कार्गोतील संकुलात शोध मोहीम राबवली. त्यात प्रत्येक डीजे लाइटमध्ये तीन किलो वजनाचे सोने सापडले. डीआरआयने असे १२ किलो सोने जप्त केले. त्याची किंमत नऊ कोटी ६० लाख रुपये आहे. सोन्याच्या तस्करीत सामील असलेल्या दोन व्यक्तींना अटक करण्यात आली. याच पद्धतीने या टोळीने पूर्वी मोठ्या प्रमाणावर सोने तस्करी केल्याचा संशय आहे. मुंबई डीआरआयने गेल्या आठवड्यात ४८ किलो तस्करीचे सोने जप्त केले.

## काँग्रेस आमदार व विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांशी प्रभारी रमेश चेन्नीथला चर्चा करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथल्ला १७ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य व २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाचे सर्व उमेदवार यांच्याशी नागपूरमध्ये चर्चा करणार आहेत. नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात ही चर्चा होणार असून सकाळी ११ वाजता आमदारांशी तर दुपारी १ वाजता विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत.

नागपूर येथे होत असलेल्या या महत्वपूर्ण चर्चेला संबंधित सर्वांनी उपस्थित रहावे असे निर्देश महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे.

## धक्कादायक! परीक्षा देतानाच विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. पेपर लिहत एका विद्यार्थ्याचा जीव गेला असल्याची घटना घडली आहे. बीडमधील के. एस. के. महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर परीक्षा देत असतानाच विद्यार्थ्याला हृदयविकाराचा झटका आला. यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीडमध्ये परीक्षा देत असताना एका २४ वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सिद्धार्थ मासाळ असे विद्यार्थ्याचे नाव असून तो पदवीच्या पहिल्या वर्षाची परीक्षा देत होता. के एस के महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर परीक्षा देत असतानाच त्याला हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला.

या तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला.हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या नसांमध्ये गाठी तयार झाल्याने त्याला हृदयविकाराचा धक्का आल्याचे शवविच्छेदनातून समोर आले आहे.

## कोरेगाव-भीमा येथे शौर्यदिन साजरा करण्यास उच्च न्यायालयाची परवानगी; २२ डिसेंबर ते ५ जानेवारीदरम्यान तयारीस शासनाला अनुमती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या १ जानेवारी रोजी कोरेगाव–भीमा येथील लढाईच्या वर्धापन दिनानिमित्त साजरा होणाऱ्या कार्यक्रमाची व्यवस्था करण्यासाठी तसेच ऐतिहासिक विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य सरकारला उच्च न्यायालयाने नुकतीच परवानगी दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारने उच्च न्यायालयात परवानगीसाठी याचिका केली होती. न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या एकलपीठाने या याचिकेची दखल घेऊन विजयस्तंभाच्या वादग्रस्त जागेवर प्रवेश करण्यासाठी राज्य सरकारला परवानगी दिली. त्यानुसार, २२ डिसेंबर ते ५ जानेवारी या कालावधीत सरकरला कार्यक्रमाची तयारी करण्यास परवानगी असणार आहे. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ५ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत सर्वसामान्यांना येथे प्रवेश देण्यात येईल, असेही न्यायालयाने नमूद केले. सहा वर्षापूर्वी २०१८ मध्ये कोरेगाव–भीमा या ठिकाणी दंगल उसळल्यानंतर ती जागा वादग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली. दंगल उसळल्यानंतर शौर्यदिनी विजयस्तंभाच्या जागेवर न्यायालयाच्या परवानगीशिवाय प्रवेश दिला जात नाही. म्हणूनच राज्य सरकार परवानगीसाठी न्यायालयात याचिका करते. त्यानंतर, न्यायालयाकडून या जागेत ठराविक कालावधीसाठी प्रवेशाची मुभा दिली जाते.

## बुलढाण्यात हिट अँड रन; तीन तरुण जागीच ठार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** येथील अमडापूर येथे शुक्रवारी रात्री उशिरा एका भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या भीषण अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. महत्वाचे म्हणजे अपघातानंतर संबंधित वाहन चालकाने तेथून पळ काढला आहे. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून वाहनाचा शोध सुरू आहे. मृतांमध्ये प्रतिक भुजे (२५), प्रथमेश भुजे (२६) आणि सौरभ शर्मा (२४) या तीन तरुणांचा समावेश आहे. यातील प्रतिक आणि प्रथमेश हे चुलत भाऊ होते, तर सौरभ त्यांचा मित्र होता.



मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाण्यात अमडापूर येथे शुक्रवारी रात्री हिट अँड रन प्रकाराने परिसरात खळबळ उडाली आहे. हे तीन तरुण चित्रपट पाहिल्यानंतर मध्य रात्री दीडच्या सुमारास चिखलीहून उदयनगरकडे आपल्या गावी येत होते. त्याचवेळी अमडापूर गावाजवळ टिपू सुलतान चौकात एका भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली की तिघेही फेकले गेले. हा अपघात इतका भीषण होता की तिघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर अज्ञात वाहनचालकाने तेथून पळ काढला. पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून वाहनाचा शोध सुरू आहे. अपघाताचा आवाज आल्याने जवळच असलेल्या टायर पंचरच्या मजुराला जाग आली आणि तो अपघातस्थळी धावत गेला. तेव्हा त्याला तिघेही तरुण रक्ताच्या थारोळ्यामध्ये पडलेले दिसले. अपघातामध्ये दुचाकीचा चुराडा झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. अमडापुर पोलिसांनी अपघातग्रस्त वाहनाचा तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे वाहनाची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या घटनेने मृत तरुणांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तीन तरुणांचा असा अंत झाल्यामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी वाहनचालकाला लवकरात लवकर अटक करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## जळगावात एसटीचा भीषण अपघात, एकाचा जागीच मृत्यू, २१ जखमी

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** धरणगाव–चोपडा रस्त्यावर पिंपळे फाट्याजवळ शनिवारी पहाटे एसटी बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर बसमधून प्रवास करणारे २१ प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघातातील जखमी बस चालकाची प्रकृती गंभीर जखमी असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांकडून देण्यात आलीय.

धरणगाव तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी एसटी बसचा अपघात झाला आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येताना दिसत आहे. शुक्रवारी पहाटे धरणगाव तालुक्यातील दोनगाव येथे बस अनियंत्रित होऊन इलेक्ट्रिक पोलला धडकली होती. या अपघातात २८ प्रवासी जखमी झाले होते. ही घटना ताजी असताना दुसऱ्या दिवशी शनिवारी पहाटे सहा वाजेच्या सुमारास धरणगाव चोपडा रोडवरील पिंपळे फाट्याजवळ बस अपघात झाला आहे.सुसाट वेगात असलेल्या बसने रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रॅक्टरला पाठीमागून धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की एसटी बस ड्रायव्हरची केबिन पूर्णपणे चक्काचूर झाली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला. तर २१ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीचं नाव कामराज सोनवणे असून ते पेशाने शिक्षक होते. ते चोपडा शहरातील प्रताप प्राथमिक विद्यालयात शिकवत होते. या अपघातात एसटीचा ड्रायव्हर गंभीर जखमी असल्याची माहिती समोर येत आहे. घटनास्थळी पोलीस निरीक्षक पवन देसले आपल्या कर्मचाऱ्यांसह पोहोचले असून वाहतूक सेवा सुरळीत झाली. सर्व जखमींवर धरणगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## एकनाथ शिंदेंच्या खास शिलेदाराचा भाजप गेम करणार! मंत्रिमंडळात पर्यायही शोधला?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून २० दिवस उलटल्यानंतरही महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराला मुहूर्त मिळत नसल्याचे चित्र होते. अखेर महायुतीच्या नेत्यांची दिल्लीवारी, त्यानंतर बैठकांचे सत्र झाल्यानंतर आता मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूरमध्ये होणार आहे. रविवारी, १५ डिसेंबर रोजी महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. नव्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून भाजप २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी तयारी करत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खास शिलेदाराचा भाजप गेम करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भाजपकडून २०२९ ची तयारी सुरू महायुतीत भाजपचे आमदार सर्वाधिक असल्याने त्यांच्या वाटेला अधिक खाती येणार आहेत. भाजपने मंत्रिपदासाठी आपला फॉर्म्युला ठरवला आहे. अनेक ज्येष्ठ नेत्यांना मंत्रिमंडळातून कमी केले जाणार आहे. त्यांच्यावर पक्ष–संघटनेची जबाबदारी टाकण्यात येणार आहे. प्रादेशिक, जातीय समीकरण जुळवताना पक्ष वाढीसाठी थेट फायदा करणाऱ्या आमदारांनाच मंत्रिमंडळात स्थान देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजपकडून आगामी काही महिन्यातच होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठीची तयारी सुरू झाली आहे. भाजपने आता विविध समाज घटकात आपले नेत्यांची निवड करण्यास सुरुवात केली आहे.

राज्यात भाजपचा ओबीसी चेहरा म्हणून पंकजा मुंडे ह्यांच्याकडे पाहिले जाते. विधानसभा निवडणूक प्रचाराच्या काळात त्यांच्या सभांसाठी चांगलीच मागणी होती. ओबीसी आणि इतर समाज घटकाला आपल्याकडे बांधून ठेवण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू झाला आहे. बंजारा समाजाची पार्श्वभूमी असणारे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय राठोड यांनादेखील भाजप पर्याय उभा करणार आहे. काही मतदारसंघात विशेषत: मराठवाडा, विदर्भात बंजारा समाजाची चांगली ताकद आहे. ही ताकद आपल्याकडे खेचण्यासाठी भाजपने प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपने शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय राठोड यांना पर्याय म्हणून डॉ. तुषार राठोड यांना ताकद देण्याचा विचार सुरू केला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. डॉ. तुषार राठोड हे मुखेडचे आमदार आहेत. तुषार राठोड यांच्या स्वच्छ प्रतिमेचा फायदा घेत बंजारा समाजावर त्यांची पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न भाजपकडून होणार असल्याची चर्चा आहे. डॉ. तुषार राठोड यांचा मंत्रिमंडळात समावेश होऊ शकतो. त्यातून त्यांना अधिक बळ देता येईल.

### कोण आहेत डॉ. तुषार राठोड?



डॉ. तुषार राठोड यांनी वर्ष २००६ ते २०१० या कालावधीत वैद्यकीय अधिकारी म्हणून ग्रामीण भागात काम केले. त्यानंतर २०१३ ते २०१४ मुखेड येथे ेिरवळेश्रेसळीीं म्हणून काम केले. त्यांचे वडील गोविंद राठोड पूर्वीपासून राजकरणात सक्रिय होते. दिवंगत नेते, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यासोबत होते. त्यानंतर त्यांनी भाजपात प्रवेश केला. गोविंद राठोड यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर ते गोपीनाथ मुंडे यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जाऊ लागले. २०१४ साली भाजपाकडून गोविंद राठोड आमदार झाले. त्याच वर्षी त्यांचे निधन झाले. पोट निवडणुकीत डॉ. तुषार राठोड ४२ हजार मतांनी विजयी झाले. त्यानंतर २०१९, २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला. भाजपातही त्यांनी विविध पदांवर काम केले. सध्या महायुतीच्या सरकारमध्ये त्यांचा समावेश होऊ शकतो.


## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज स्मृतिदिन. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

# “उद्या काही स्फोट होईल तर”; संतोष देशमुख हत्या प्रकरणी संभाजीराजेंचा फडणवीसांना इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. संतोष देशमुख यांचं अपहरण झाल्यानंतर त्यांचे कुटुंबिय, निकटवर्तीय व मित्र परिवाराने त्यांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ते कुठेच आढळून आले नाहीत. त्यानंतर त्यांचा मृतदेह सापडला. हे प्रकरण आता चांगलेच पेटले असून आरोपींना शिक्षा मिळावी यासाठी राजकीय क्षेत्रातूनदेखील राज्य सरकारवर दबाव टाकला जात आहे. यादरम्यान संभाजीराजे छत्रपती यांनी आज (१४ डिसेंबर) संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट





घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात लक्ष देण्याची विनंती केली आहे.

संभाजीराजे नेमकं काय म्हणाले?

मस्साजोग गावात संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेत्यानंतर माध्यमांशी बोलताना संभाजीराजे म्हणाले की, ''माझी मुख्यमंत्र्यांना विनंतीपूर्वक सूचना आहे की तुम्ही जातीने यामध्ये लक्ष घाला. अजूनही हा विषय हातातला आहे. लोकांच्या भावना मी ऐकल्या , उद्या काहीतरी स्फोट होईल तर मी जबाबदार असणार नाही. पोलीसांनी साडेतीन तास मजा बघत साधा गुन्हा नोंद केला नाही, आणि त्या वाल्मिकी कराडला गुन्हा नोंद करूनही तो इकडे तिकडे फिरतो आहे. हे सरकारला कसं चालतंय?'' असा सवाल संभाजीराजेंनी उपस्थित केला. ''मी पूर्णपणे ग्रामस्थांबरोबर आहे, जो ग्रामस्थ निर्णय घेतली त्याबरोबर संभाजीराजे असतील'', असेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. मस्साजोग गावतील नागरिकांकडून आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले जात आहे. गावकऱ्यांकडून आरोपांना तातडीने अटक करण्याची मागणी केली जात आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची मागणी देखील गावकरी करत आहेत. यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मान्य करत गावकऱ्यांना आश्वासन दिले आहे. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तर अद्याप दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

हत्येमागील कारण काय?

६ डिसेंबर रोजी मस्साजोग येथे अवादा पवन ऊर्जा या पवनचक्की प्रकल्पाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्या प्रकल्पावर सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे सुरक्षा रक्षक हे मस्साजोग येथील असल्याने सरपंच संतोष देशमुख यांनी प्रकरणात हस्तक्षेप केला आणि मारहाण कर्णायावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचा राग मनात धरून अपहरणकर्त्यानी त्यांचा खून केल्याचा आरोप होत आहे.

## चंकी पांडेमुळे भाजला होता या अभिनेत्रीचा पाय, तेव्हा अभिनेत्याला मारायचे होते सहकलाकाराला

**मुंबई/प्रतिनिधी** : नीलम कोठारी आणि चंकी पांडे यांनी त्यांच्या काळात अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. त्यांचे चित्रपटही लोकांना खूप आवडले आहेत. आजही चंकी पांडेची पत्नी आणि नीलम कोठारी खूप चांगल्या मैत्रिणी आहेत. नीलमने तिच्या करिअरच्या सुरुवातीला चंकी पांडेसोबत काम केले होते, पण आजही तिला चंकी पांडेच्या एका कृतीची खूप भीती वाटते, जी ‘आग ही आग’ चित्रपटाच्या शूटिंगशी संबंधित आहे.

नीलम कोठारी हिनेच या घटनेचा खुलासा केला होता. नीलमने रेडिओ नशाशी बोलताना सांगितले होते की, ‘आग ही आग’च्या शूटिंगदरम्यान चंकीमुळे नीलमचा पाय भाजला होता आणि आजही त्याची जखम तिच्या पायावर आहे.

नीलमने सांगितले होते की, चंकी पांडे तिला चित्रपटाच्या सेटवर खूप चिडवायचा. नीलम म्हणाली, आग ही आग शूट होत होती. मी लग्नमंडपात नववधूचा पेहराव करून बसले होते. सीन असा होता की मी दुसऱ्याशी लग्न करत असते आणि त्याच क्षणी चंकी पांडे बाईकवर येऊन मला तिथून घेऊन जाणार होता. यासाठी मी चंकीला अनेक वेळा विचारले की त्याला बाईक कशी चालवायची हे माहित आहे की नाही. चंकी प्रत्येक वेळी म्हणाला की हो येते.

नीलम पुढे म्हणाली, चंकीला बाईक कशी चालवायची हे माहित नव्हते, तो फक्त विनोद करत होता. त्याने मला मंडपातून उचलले आणि एस्केलेटर इतक्या वेगाने दाबले की मी पडले आणि बाइक माझ्या अंगावर पडली. मी वधूच्या पोशाखात होते आणि माझा पाय भाजला. त्याच्या खुणा अजूनही माझ्या पायावर आहेत. आजही मी चंकीला ती खुण दाखवते, हे डाग कधीच जाणार नाहीत. त्यावेळी मला चंकीला मारायचे होते. ते काहीही असो, पण आम्ही अजूनही चांगले मित्र आहोत.



# संसदेत अदाणींच्या मुद्द्यावर काँग्रेस एकाकी, शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही सोडला हात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : संसदेचे हिवाळी अधिवेशन काँग्रेसणे अदाणींच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. मात्र यामध्ये काँग्रेस पक्षाच्या इतर सहकाऱ्यांनी मात्र साथ सोडल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने देखील शुक्रवारी कोणत्या उद्योगपतीचे कोणाशी संबंध आहेत यापेक्षा जर शेतकरी आणि तरूणांच्या मुद्द्यावर चर्चा केली तर संसदेच्या वेळेचा चांगला उपयोग होईल असे म्हटले आहे.


काँग्रेसचे इंडिया आघाडीतील इतर सहकारी पक्ष – तृणमूल काँग्रेस (ऊश्ण), शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि समाजवादी पक्ष (एझ) यांनीही या मुद्द्यापासून अंतर राखले आहेत. फक्त काँग्रेसच संसदेत या अदाणींच्या मुद्द्यावर दररोज आंदोलन करत आहे. तृणमूल काँग्रेस पक्षाने तर उघडपणे गौतम अदाणी यांच्या चौकशीच्या मुद्द्यापेक्षा इतर अनेक महत्त्वाचे मुद्दे असल्याचे म्हटले आहे. त्यानंतर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही अंग काढून घेतल्याने काँग्रेसकडे अदाणींचा मुद्दा सोडून देण्यासाठी दबाव वाढला आहे.

लोकसभेत संविधान स्वीकारल्याच्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या चर्चेत सहभागी होताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, ''संविधानाने संसदेला घटनात्मक व्यवस्थेत प्रमुख स्थान दिले आहे. दुर्दैवाने, बऱ्याचदा आपण त्याचे राजकीय रणांगणात रूपांतर झाल्याते अनुभवतो. वैयक्तिक टिप्पणी केल्याने बऱ्याचदा संसदेचं काम काज थांबवलं जातं. कोणत्या राजकीय नेत्याचे उद्योगांशी संबंध आहेत, कोणता नेता कोणाच्या विमानात कुठे गेला किंवा कोणत्या परदेशातील नेत्याने स्थानिक नेत्याला देणगी दिली यापेक्षा आपल्या शेतकरी आणि तरूणांचे मुद्दे उपस्थित केले जाता आहेत की नाही याची काळजी आपल्याला असली पाहिजे. आम्हाला देशासाठी महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा हवी आहे, राजकीय घोषणा नको आहेत. सरकार आणि विरोधक या दोन्हीनी हे लक्षात घेतले पाहिजे''. पुढे कोल्हे यांनी शेतर्कयांना त्यांच्या मालाची योग्य किंमत कशी मिळाली पाहिजे आणि तरूणांसाठी चांगल्या रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध झाल्या पाहिजेत याबद्दल देखील भाष्य केले.

पवारांकडून यापूर्वीही अदाणींचा बचाव

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत सांगितले होते की, पाच वर्षापूर्वी अदाणी भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमध्ये झालेल्या हे महाराष्ट्रातील सत्ता स्थापनेच्या चर्चेमध्ये सहभागी होते. ही गोष्ट २०१९ सालची आहे. जेव्हा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत युतीच्या विजयानंतर शिवसेना एनडीएमधून बाहेर पडली आणि अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.

या घटनेबद्दल बोलताना अजित पवार यांनी द न्यूज मिनिट आणि न्यूजलँड्रीला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या मुलाखतीत बोलताना सांगितले की, ''सर्वांना माहिती आहे की ही बैठक कुठे झालीष्ठ प्रत्येकजण तिथे होता. मी तुम्हाला पुन्हा सांगतो. अमित शहा, गौतम अदाणी, प्रफुल्ल पटेल, देवेंद्र फडणवीस होते, अजित पवार , पवार साहेब (शरद पवार) होते.''



शरद पवारांनी माध्यमांना सांगितले की, भाजपाच्या नेत्यांना अदाणी यांच्या घरी भेटण्यासाठी ते तयार झाले कारण पक्षातील सहकारी त्यांच्यावरील खटल्यांबद्दल चिंतेत होते आणि भाजपाबरोबर गेल्याशिवाय सुटकेचा दुसरा पर्याय नाही असे त्यांना वाटत होते. मी चर्चेवर विश्वास ठेवतो असेही शरद पवार म्हणाले होते.

काही काळाने राष्ट्रवादी काँग्रेसमधील बहुतांश आमदारांना घेऊन २०२२ मध्ये अजित पवार एनडीएमध्ये सहभागी झाले आणि भाजपा आणि एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेशी हातमिळवणी करत महायुतीचे सरकार स्थापन करण्यात आले. नुकतेच या तीन पक्षाच्या महायुतीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत २३० हून अधिक जागा जिंकत विजय मिळवला आहे.

हिंडेनबर्ग रिसर्चने अदाणी समूहावर केलेल्या आरोपांमुळे भारताच्या राजकीय वर्तुळात हादरून गेल्याचे पाहायला मिळाले. यानंतर संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) चौकशीच्या मागणीने जोर धरला, त्यावेळी शरद पवार यांनी काँग्रेसहून वेगळी भूमिका घेतली आणि अदाणी समूहाला अज्ञातांकडून लक्ष्य केले जात असल्याचे म्हटले.

अदाणी समूदाची भागीदारी असलेल्या एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी काँग्रेसच्या जेपीसी चौकशीची मागणी पासून स्वत:ला दूर ठेवले आणि या प्रकरणावर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधकांकडून संसद ठप्प करण्याशी ते सहमत नसल्याचेही सांगितले.

टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांनी बुधवारी भाजपा आणि काँग्रेस दोन पक्षांना संसदेच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल दोषी ठरवले. त्यांनी अदाणींच्या मुद्द्यावर अडकलेल्या काँग्रेसवर टीका केली.

## जिल्ह्यात मसूर बियाणे मिनी किटच्या माध्यमातून मसूर पिकाचा प्रसार

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : कडधान्याच्या क्षेत्र विस्तारासाठी मसूर पिकाच्या नवीन वाणांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कृषि विभागामार्फत अन्न आणि पोषण सुरक्षा कडधान्य सन २०२४–२५ अंतर्गत राष्ट्रीय बीज निगम पुणे या पुरवठादार संस्थेमार्फत मसूर ( वाण– कोटा मसूर, मसूर एल–४७२७) पिकाच्या ४०० संख्या बियाणे मिनी किटच्या प्रायोगिक तत्वावर पुरवठा करण्यात आला आहे. मसूर बियाणे मिनी किट सोबत जैविक खते तसेच लागवड तंत्रज्ञान व वाणाविषयक माहिती असलेल्या घडीपत्रिका शेतकऱ्यांना दिली आहे. जिल्ह्यातील इच्छुक वैयक्तिक, प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्यांना विनामुल्य मसूर बियाणे मिनी किटचे वाटप करण्यात आले होते.

यामुळे जिल्ह्यातील ४०० लाभार्थी शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला असून १०६ हेक्टर क्षेत्रावर प्रात्यक्षिके राबविण्यात आले आहे. प्रात्यक्षिक क्षेत्राचे कृषि किसान मोबाईल ?पद्वारे उाद–ऊरुग्हु करण्यात येणार आहे. तसेच वाटप करण्यात आलेल्या मिनी किटमध्ये तुलनात्मक पिक कापणी प्रयोगाद्वारे उत्पादन क्षमता पाहिले जाणार आहे. तरी तांत्रिक माहितीसाठी आपण संबंधित तालुक्यातील कृषि विभागाशी तसेच गावपातळीवर कृषि सहायकांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषि उपसंचालक नामदेव परीट व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जालिंदर पांगरे यांनी केले आहे.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### ठाकरे गटाच्या शहर प्रमुखाच्या अपहरण प्रकरणी सात आरोपींना पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : शिवसेना ठाकरे गटाचे शिवसेना शहरप्रमुख गौरव कोटगीरे यांचे काही अज्ञातांनी काल रात्री ९ वाजता अपहरण केलं होते. या घटनेला आता वेगळेच वळण लागलं आहे. गौरव कोटगीरे यांचे आपहरण वाहने खरेदी विक्री फायनान्सच्या व्यवहारातून करण्यात आल्याचे समोर आले आहे. या अपहरणातील सात आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. हे सर्व आरोपी गंभीर गुन्ह्यातील रेकॉर्ड वरील आरोपी आहेत.

### थंडीमुळे एपीएमसी बाजारात लिंबाचे भाव घसरले



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : थंडीचा कडाका वाढल्यामुळे नवी मुंबईतील एपीएमसी बाजारात लिंबाचे भाव हे घसरले आहेत. मार्केटमध्ये लिंबूची आवक जास्त असल्यामुळे दर कमी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. गेल्या महिन्याभरापासून बाजारात लिंबूचे दर कमी आहेत. आता बाजारामध्ये लिंबाची २२ किलोची गोणी चारशे रुपयांनी विकली जात आहे याआधी भाव जास्त होते अशी प्रतिक्रिया व्यापाऱ्याने दिली आहे.

### कोल्हापूरच्या नृसिंहवाडीतील कृष्णा-पंचगंगा संगमतीर्थावर दत्त जयंती उत्साहात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : दत्तजयंती सर्वत्र मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरी होतीय. यानिमित्ताने पहाटेपासूनच कोल्हापूरच्या नृसिंहवाडीतील कृष्णा-पंचगंगा संगमतीर्थावर दत्त दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. 'दिगंबरा दिगंबरा'च्या अखंड गजरात संपूर्ण नृसिंहवाडी दुमदूमून गेलीय. कृष्णा नदीत पवित्र स्नान करून गुरुदेव दत्ताचे दर्शन घेतले जाते. त्यामुळेच वाढलेल्या गर्दीच्या अनुषंगाने दत्त देवस्थानच्या वतीने काळजी घेतली होती. मंदिराच्या उत्तर बाजूस तीन ठिकाणी दर्शनरांगेचे नियोजन केलंय. त्यामुळे भाविकांना दत्तप्रभूंचे दर्शन घेणं सोपं झाले

### शिक्षकाच्या खून प्रकरणी बीड न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल; गुजरखान गँगमधील १२ आरोपींना जन्मठेप

**बीड/प्रतिनिधी** :बीड शहरातील सय्यद साजेद अली मिर अन्सार अली या शिक्षकाचा २०१९ मध्ये भरदुपारी खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा निकाल लागला असून यात गुजर खानसह त्याच्या गँगमधील १८ पैकी १२ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच दोघांना कारावास आणि दंड ठोठावला आहे, तर तिघांना निर्दोष मुक्त केले आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड तथा विशेष मोक्का न्या. एस.आर.पाटील यांनी हा निकाल दिला आहे. आतापर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षा होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने, त्यदृष्टीने हा ऐतिहासिक निकाल समजला जात आहे. सय्यद साजेद अली या शिक्षकाकडे गुजर खान गँगने खंडणी मागितली होती. ती न दिल्याने २०१३ साली साजेद यांच्यावर हल्ला करून त्यांचे पाय तोडण्यात आले होते.

याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. न्यायालयात दाखल झालेली केस मागे घेत नसल्याच्या कारणातून १९ सप्टेंबर २०१९ रोजी भर दुपारी साजेद अली यांचा खून करण्यात आला होता. दरम्यान या प्रकरणात बीड न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे.

# शरद पवार आमच्या सोबत आले तर आम्हाला फायदा होईल- रामदास आठवले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : जे संविधान मानत नाही, त्यांनी भारत सोडून जावं अशी माझी सूचना आहे संविधानाचा अपमान झाल्यानंतर संविधान प्रेमी रस्त्यावर उतरले, कुठले ही दुकाने फुटली नाही, केवळ दुकानासमोरील बोर्ड फुटले, संपूर्ण प्रकाराची चौकशी झाली पाहिजे, त्याच्या मागे कोण आहे हे तपासा मी मुख्यमंत्री यांना सांगितले होते, कोंबिंग थांबवा.पोलिसांच्या मारहाणीची चौकशी होणे गरजेचे आहे संसदेत आपापल्या परीने प्रश्न्न उपस्थित करणार, कायदा कोणी हातात घेतलेला नाही, केस वापस घेण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना सांगणार आहे.खासगी नागरिकांनी मारहाण केली तर त्याची चौकशी पोलिसांनी करावी, पोलिसांनी तोडफोड केली असेल तर त्याची कारवाई व्हावी राज्यात मागील काही दिवसापासून महाविकास आघाडीच्या वतीने ईव्हीएम मशीनला विरोध केला जात आहे त्याविषयी शंका व्यक्त केला जात आहेत पण ईव्हीएम हे पंतप्रधान मोदी यांनी आणले नसून काँग्रेसच्या काळात ते आले आहे. ज्यावेळेस काँग्रेसला चांगले यश मिळते त्यावेळेस काँग्रेस आणि त्यांचे सहकारी ईव्हीएमला काहीच दोष देत



नाहीत पण जेव्हा त्यांना अपयश येते तेव्हा मात्र ते ईव्हीएमला दोष देऊन मोकळे होतात.लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्या कर्नाटक मध्ये बहुमत मिळाले त्यावेळेस मात्र काँग्रेसने शीं विषयी एकही शब्द काढला नाही पण आता हरियाणा महाराष्ट्र मध्ये महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले की ईव्हीएम विषयी शंका घेण्यास सुरुवात झाली आहे हा निव्वळ पोरकटपणा आहे. शरद पवार यांनी उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या ईव्हीएम विरोध मोहीमला विरोध करावा.आम्हीच एकत्र येत नाही तर ते कसे एकत्र येतील, दोघे एकत्र आल्यास माझ्या शुभेच्छा- शरद पवार आमच्या सोबत आले तर आम्हाला फायदा होईल.एक मंत्रिपद आणि एक विधान परिषद द्यावे अशी आमची मागणी आहे.आमचा गट ज्यांच्या सोबत आहे त्यांना सत्ता मिळते, एक मंत्रिपदाची मागणी आमची आहे असे रामदास आठवले,केंद्रीयमंत्री म्हटले आहेत

# विमुक्त जाती,भटक्या जमातीतील नागरिकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळांची कर्ज योजना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विजा, भज, विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांना स्वयंरोजगारासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना सुरु आहे. इच्छुक व्यक्ती व संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ व राजे उमाजी नाईक आर्थि विकास महामंडळ या दोन उपकंपनीमार्फत वडार व रामोशी समाजातील लोकांसाठी

**वैयक्तिक कर्ज १० लाख तर गटासाठी ५० लाखापर्यंत मिळतो कर्ज**

स्वयंरोजगाराच्या माध्यमातून कृषी सलंग्न व्यवसाय, लघुउद्योग, वाहतूक क्षेत्रासंबंधित व्यवसाय, तांत्रिक व्यवसाय, पारंपरिक व्यवसाय अथवा सेवा उद्योग सुरु करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँक व महामंडळ यांच्या संयुक्त माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना सुरु आहे.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रुपये १० लाखापर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो व गट कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत रुपये ५० लाखापर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. या दोन्ही योजनांमध्ये लाभार्थ्याला मुद्दल आणि व्याज बँकेत भरावयाची आहे, त्यानंतर महामंडळ व्याजाची रक्कम १२ टक्क्यांपर्यंत लाभार्थ्याच्या वैयक्तिक खात्यात जमा करते. या योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचना महामंडळाच्या www.vjnt.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या योजनेच्या लाभासाठी संकेतस्थळावरील पोर्टलद्वारे ऑनलाईन प्रस्ताव सादर करावयाचा आहे. तसेच बीज भांडवल कर्ज योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत व थेट कर्ज योजनेअंतर्गत १ लाख रुपये बिनव्याजी कर्ज पुरवठा करण्यात येतो. या योजनेकरीता महामंडळाच्या कार्यालयात अर्ज उपलब्ध आहेत.

या योजनेच्या अधिक महितीसाठी महामंडळाच्या कार्यालयात येवून संपर्क साधावा व जास्तीत जास्त इच्छूक व्यक्ती व संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आव्हान महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# भाजपचं सरकार आल्यानंतर हिंदू मंदिरं धोक्यात

## उद्धव ठाकरेंनी भाजपचं नकली हिंदुत्व केलं एक्सपोज; आदित्य ठाकरे कडाडले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : रेल्वेने दादरचे ८० वर्षे जुने हनुमानाचे मंदिर पाडण्यासाठी नोटीस बजावली होती. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर हल्लाबोल केला. 'एक है तो सेफ है म्हणतात, पण मंदिरही सेफ नाहीत', अशी टीका त्यांनी केली होती. तर युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे हे आज हनुमान मंदिरात महाआरती करायला जाणार आहेत. मात्र त्याआधीच मंदिराला मिळालेल्या नोटीसीला रेल्वेकडून स्थगिती देण्यात आली आहे. आता यावरून आदित्य ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीकास्त्र डागले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, काल उद्धव ठाकरे यांनी भाजपाचं नकली हिंदुत्व एक्स्पोज केले. आणि आज रेल्वेने मंदिर पडण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली. काही भाजपचे लोक तिथे नाटक करत आहेत. आम्ही ५.३० वाजता तिथे जाणार आहोत. भाजपचं नकली हिंदुत्व आहे. फक्त निवडणुकीसाठी हिंदुत्व वापरलं जात आहे. भाजपचं सरकार आल्यानंतर हिंदू मंदिरं धोक्यात आली आहेत, असा हल्लाबोल त्यांनी केला आहे.

**आता तरी भाजपला जाग आली**

तर मुंबईत रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे सुरू असून ही कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार यांनी केला. या कामांच्या दर्जाची तपासणी करावी व निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यावरून आदित्य ठाकरेंनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी म्हटलंय की, रस्त्याचा घोटाळा आम्ही समोर आणला. त्यानंतर पालिकेला मान्य करावं लागलं की ॲडव्हान्स मोबिलिटीची गरज नाही. दीपक केसरकर घोटाळा करत आहे की नाही, हे मला माहीत नाही. पण अद्याप शाळेतील मुलांना गणवेश मिळाला नाही. मुंबईतील भाजपवाले बोलत आहे की, रस्त्यासाठी एघ्ऊ लावा आणि चौकशी करा. आता तरी भाजपला जाग आली आहे. एसआयटीपेक्षा आर्थिक गुन्हे शाखेची चौकशी लावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**शिंदे, केसरकरांना सरकारमधून बाहेर बसवा**

आमदार आणि पत्रकारांना देखील त्यात बसवा. आम्ही बोलत होतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हातून रस्त्याचे उद्घाटन करू नका, त्यांचा अपमान होईल. पण यांनी ऐकले नाही. एकनाथ शिंदे यांनी घाईगडबडीत उद्घाटन केले. आता पालिकेची बातमी आली आहे की, कचऱ्यासाठी पैसे घ्यायचे. मुंबईचा कचरा १० हजारावरून आपण साडेसहा हजार मेट्रिक टनवर आणला. आता भाजपचे सरकार आले, त्यानंतर एकदम पालिकेला जाग आली आहे. मुंबईत अनेक जागांवर कचऱ्याचे ढिगारे आहेत. मग त्याचे पैसे आम्हाला देणार का? मुंबईला अदानीच्या घशात घातले आहे. देवेंद्र फडणवीसांना आता मौका आहे की, साफ सरकार चालवायचं असेल तर एकनाथ शिंदे आणि दीपक केसरकर यांना सरकारमधून बाहेर बसवावे. त्यांची चौकशी करा, आम्ही मान्य करू की तुमचे वाशिंग मशीनचे सरकार नाही, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

# सोमय्यांना पाहताच ठाकरेंचे शिवसैनिक आक्रमक; दादरच्या हनुमान मंदिराबाहेर राडा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : दादरच्या हनुमान मंदिराच्या आवारात ठाकरेंचे शिवसैनिक आणि भाजपचे किरीट सोमय्या आमने सामने आले आणि एकच गोंधळ उडाल्याचं पाहायला मिळालं. किरीट सोमय्यांना पाहताच ठाकरेंचे शिवसैनिक आक्रमक झाले आणि त्यांनी सोमय्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत किरीट सोमय्यांना बाहेर काढलं.



दादरच्या हनुमान मंदिराला रेल्वेने नोटीस दिली होती. त्यावरून उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे चांगलेच आक्रमक झाले होते. आदित्य ठाकरे आज या मंदिरात येऊन महाआरती घेणार आहेत. पण त्याच्या आधीच भाजप नेते किरीट सोमय्या दर्शनासाठी आले. त्यावेळी मंदिराच्या परिसरात मोठ्या प्रमाणात शिवसैनिक उपस्थित होते.

किरीट सोमय्यांना पाहताच ठाकरेंचे शिवसैनिक आक्रमक झाले आणि त्यांनी सोमय्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यावेळी भाजप आणि सेनेचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप केला.

**किरीट सोमय्या काय म्हणाले?**

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे हिंदुत्व घेत आहेत. कारण या मुद्द्यावर डिपॉझिट जप्त झाली आहेत. ज्यांनी हनुमान चालीसा वाचणाऱ्यांना जेलमध्ये टाकले त्यांना हनुमानाच्या चरणी जावे लागत आहे अशी प्रतिक्रिया किरीट सोमय्या यांनी दिली आहे.

दादर रेल्वे स्टेशनजवळच्या हनुमान मंदिराला रेल्वेने नोटीस दिली होती. शुक्रवारी उद्धव ठाकरेंनी या मुद्द्यावरुन महायुती सरकारवर टीका केली. भाजपच्या हिंदुत्वावर प्रश्नचिन्ह उभं करत भाजपला आरोपीच्या उभा करण्याचा प्रयत्न उद्धव ठाकरेंनी केला. त्यानंतर आदित्य ठाकरेंनी शनिवारी त्या मंदिरात जाऊन आरती करणार असल्याची घोषणा केली.

या सर्व घडामोडी पाहता भाजप काय करणार याकडे सर्वाच लक्ष होतं. भाजपचे नेते मंगलप्रभात लोढा हनुमान मंदिरात पोहोचले आणि रेल्वेने नोटिशीला स्थगिती दिल्याची घोषणा केली. मंदिरात नित्य पूजा, आरती सुरुच राहील असं त्यांनी स्पष्ट केलं. त्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने केलेल्या पाठपुराव्याचा आर्वजून उल्लेख त्यांनी केला.

त्यानंतर मात्र आदित्य ठाकरेंनी भाजपवर टीका केली. हनुमान मंदिराला घाईघाईने स्थगिती दिली. काल उद्धव ठाकरेंनी भाजपचं नकली हिंदुत्व एक्स्पोज केलं आणि आज रेल्वेने स्थगिती दिली अशा शब्दात आदित्य ठाकरेंनी भाजपवर टीका केली.

# पोलीस आयुक्त कार्यालयासमोर माजी सैनिकांचे कुटुंबासह आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यात माजी सैनिकांचे न्याय मिळण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं आहे. सेवानिवृत्त फौजी ३५५ लोकांची ३० कोटी पेक्षा जास्त पैशांची फसवणूक एस. जी. ट्रेडिंग कंपनीने केली आहे. त्याबाबत कायदेशीर फिर्याद ३ ऑगस्ट २०२४ रोजी मुंडवा पोलीस ठाणे येथे दाखल केली आहे. परंतु अजूनही न्याय मिळाला नसल्याने माजी सैनिक कुटुंबियासह आंदोलनास बसले आहेत. पुणे पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसून त्या विरोधात सर्व सेवानिवृत्त माजी सैनिक लोक आज पुणे पोलीस आयुक्त कार्यालय समोर लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

यावेळी बोलताना आंदोलक म्हणाले,आम्ही सर्व सैन्यातील सेवानिवृत्त माजी सैनिक असून एस. जी. ट्रेडिंग कंपनी. बीटी कवडे रोड पुणे नावाची एका कंपनीने साधारण आमचे ३५५ लोकांची ३० कोटी पेक्षा जास्त पैशाची फसवणूक केल्या बाबतची तक्रार आम्ही लोकांनी दिनांक ३/८/२०२२ रोजी मुंडवा पोलीस ठाणे येथे दाखल




केली होती. त्याचे एफ.आय.आर नंबर ०३/३२५ दिनांक ३ ऑगस्ट २०२४ असून कायदेशीर रित्या गुन्हा दाखल केले आहे. मुंडवा पोलीस स्टेशन येथील अधिकाऱ्यांनी ३५५ लोकांचा जब जबाब घेऊ सदरचा केस १७ दिवसानंतर पुणे आर्थिक गुन्हे शाखा येथे वर्ग केला आहे.

सदर केस बाबत आम्ही सर्व फिर्यादी यांनी वारंवार आर्थिक गुन्हे शाखा पुणे अधिकाऱ्यांना भेटून आमची सर्व हकीकत त्यांच्यासमोर मांडली आहे. एकूण ३५३ लोक या केस मध्ये फिर्यादी असून सर्वांच्या जाब जवाब झालेले आहे. सदर केस मध्ये असलेले आरोपी शुभांगी मोहिते, निकिता शितोळे, सौरभ गजरे, गंगाधर मुळे, मुख्य आरोपी सुरेश गाडीवडार, किरण दलाल अमर शेलार, संकल्प चव्हाण, संजय सिंग, सुभाष गाडीवडर व इतर आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद आहे. पुणे आर्थिक गुन्हे शाखा यांनी आज रोजी पर्यंत कोणतीही विचारपूस किंवा तपास केले नाही व यापैकी कोणत्याही आरोपींना आज रोजी पर्यंत ताब्यात सुद्धा घेतले नाही अशी खात्रीलायक माहिती आमच्यापर्यंत आहे. सदर केस मध्ये असलेले आरोपी यांना आज रोजी पर्यंत का ताब्यात घेतले गेले नाही व वरील सर्व संघटित गुन्हेगारांना का मोकळा सोडले गेले आरोपींना अटक करून न्यायालय पुढे सादर करण्यासाठी का विलंब लावला जात आहे. याबाबत खुलासा होणे गरजेचे आहे सदर केसचे इन्वेस्टीगेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांना भेटल्यानंतर आम्हाला समाधानकारक उत्तर दिले जात नाही.

आम्ही सर्व देशाची सेवा करून फौज मधून सेवानिवृत्त झाल्यानंतर प्रायव्हेट फंडाच्या मिळालेल्या पैशाची पूर्णपणे एस. जी. ट्रेडिंग कंपनी कडे गुंतवणूक केली होती. सदर कंपनीने आमची मोठी फसवणूक केल्यामुळे आम्ही सर्व गुंतवणूकदार यामुळे आर्थिक अडचणीमध्ये आलेले आहे अशा परिस्थितीमध्ये आम्हाला न्याय मिळावा ही अपेक्षा आम्ही सर्वांनी पुणे पोलिसांकडून केली होती मात्र ते पूर्ण होत नसल्याचे आज रोजी आम्हाला दिसून येत आहे. दिलेल्या फिर्यादनुसार सर्व आरोपींना अटक न केल्यामुळे पुणे पोलिसावर आमचा संशय वाढत आहे असे आंदोलकांनी सांगितले आहे. एस.जी. ट्रेडिंग कंपनीचे मालक व सोबत काम करणाऱ्या त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांन त्वरित अटक करून न्यायालय पुढे सादर करावा संबंधित सर्व आरोपींची मालमत्ता जप्त करून गुंतवणूकदार यांना मिळवून देण्यासाठीप्रयत्नकरावे अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

# प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तबांखु व वाहनासह ७ लाखांचा मुद्देमाल जप्त; बिटरगाव पोलीस स्टेशनची कार्यवाही

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** राज्यात गुटखा निर्मिती आणि विक्री करण्यास कायदेशीर बंदी असूनही, १३डिसेंबर रात्रीला आटो मधुन सुगंधीत तंबाखुची अवैध वाहतुक होणार आहे. अशा गोपनीय माहीतीवरून बिटरगाव ठाणेदार यांनी आपल्या टीम सोबत सिताफिने सापळा रचुन सोईट ते ढाणकी रोडवर एक पिवळया रंगाचा मालवाहु ऑटो मध्ये पाच लाख चाळीस हजाराचा गुटखा पकडला.

या कारवाईमध्ये,अल्फा महीन्द्रा ऑटो चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव तौफिक खान फकीर खान( ३५ ),रा. जामा मस्जिद वार्ड उमरखेड असे सांगितले व त्याच्या ताब्यातील सदर तीन चाकी अल्फा महीन्द्रा ऑटो क्र. एम एच ०३ ए एब ७६३६ त्याचे मालकिचे असल्याचे सांगीतले वाहणाची पाहाणी केली असता



पाच लाख चाळीस हजार रुपयांचा गुटखा पोलिसांच्या हाती लागला. अवैध वहातुक करण्यासाठी वापरण्यात आलेला अल्फा महीन्द्रा ऑटो क्र. एम एच ०३ ए एच ७६.३६ याची किंमत अंदाजे १,६०,०००/– असा एकूण ७,००,०००/रू चा मुददेमाल पोलिसांनी जप्त केला. विनापरवाना व प्रतिबंध असलेला जर्दा तम्बाखु विक्री करीता बाळगुन असतांना मिळवून आला व जप्त करून आरोपी विरूध्द अन्न व सुरक्षा व मानदे कायदा सन २००६ नियम व नियमने २०११चे कलम २६(२) कलम २७, कलम ३०(२) (अ), कलम नुसार कार्यवाही करण्याची प्रक्रीया सुरू केली आहे.

सदरची कार्यवाही कुमार चिंता पोलीस अधीक्षक यवतमाळ, पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ, सी रजनिकांत उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड यांचे मार्गदर्शनात ठाणेदार संतोष मनवर, पुरवठा निरीक्षक अमितकुमार उपलप अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व प्रशासण यवतमाळ पो. उप.नि. शिवाजी टिपुणे, पोहेकों रवि गिते, पोना देविदास हाके, पोकों निलेश भालेराव, बालाजी मस्के व प्रविण जाधव यांनी केली पुढील तपास पो उप नि. शिवाजी टिपुर्णे हे करीत आहे.

## विविध वृत्त...

### राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या रँकिंगमध्ये बुलढाणा जिल्हा पिछाडीवर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या निर्देशांकावर आधारित जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील ऑक्टोबर महिन्यातील रँकिंग राज्यस्तरावर तयार करण्यात आली त्याची घोषणा काल करण्यात आली. या रँकिंगमध्ये बुलढाणा जिल्हा पिछाडीवर आहे. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंतर्गत मातृ स्वास्थ, मुलांचे आरोग्य, कुटुंब नियोजन, लसीकरण, साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना , किशोरवयीन आरोग्य, आशा कार्यक्रम, प्रशासन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कुपोषण अशा सेवा निर्देशांकाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या पथकामार्फत जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या आधीन असलेल्या संस्थांमध्ये प्रत्यक्ष पडताळणी व पाहणी केली होती. यात बुलढाणा जिल्हा अतिशय शेवटच्या स्थानी आढळून आला आहे. ऑक्टोबर २०२४ ची रँकिंग जाहीर झाली असून यात वाशिम जिल्हा सर्वप्रथम तर नाशिक जिल्हा द्वितीय तर ठाणे जिल्हा तृतीय स्थानावर आहे. रँकिंग ही आरोग्य विभागामार्फत जे तांत्रिक कामकाज चालते त्याच्या माध्यमातून होते. मागील एका वर्षापासून आपण पहिल्या दहा मध्ये होतो मात्र काही दिवसापासून ऑनलाईन रिपोर्टिंगमध्ये तांत्रिक अडचणी येत होत्या तसेच थोडा दुर्लक्ष झाल्यामुळे मार्क कमी झालेत. यापुढे नक्कीच त्यामध्ये लक्ष घालू आणि जिल्हा पहिल्या दहामध्ये कसा येईल यासाठी प्रयत्न करु अशी प्रतिक्रिया जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी दिली आहे.

### दुर्गम भाग असलेल्या अक्कलकुवा तालुक्यासाठी आरोग्य विभागामार्फत १३ रुग्णवाहिका उपलब्ध



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** शासनाच्या आरोग्य विभागाकडून अक्कलकुवा आणि धडगाव या दोन तालुक्यासाठी १३ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या त्या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा अक्कलकुव्यातील आमदार कार्यालय येथे संपन्न झाला. आमदार आमश्या पाडवी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आमदार आमश्या पाडवी यांनी आभार मानले. या भागातील आरोग्याची समस्या कमी होईल आणि नागरिकांना आरोग्यासाठी चांगली सुविधा मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया आमदार आमश्या पाडवी यांनी दिली आहे.

## अपघात गटविमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत मच्छिमारांची माहिती सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र पुरस्कृत अपघात गटविमा योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत मच्छिमार सहकारी संस्थांनी मच्छिमारांची माहिती सादर करण्याचे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त सु.ग.गावडे यांनी केले आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत सर्व मच्छिमार सहकारी संस्थांमधील नोंदणीकृत सभासदांना अपघात गटविमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण व नैसर्गिक आपत्ती आल्यास त्यांच्या वारसांना विमा रक्कम मिळण्यासाठी माहिती सादर करणे अनिवार्य आहे. ही माहिती सादर करतांना नोंदणीकृत मच्छिमार सहकारी संस्थेमधील प्रत्येक मच्छिमार सभासदाचे नाव व पत्ता, आधार कार्ड क्रमांक, जन्म दिनांक, बँकेचे खाते क्रमांक, आयएफएससी कोड, बँकेचे नाव व पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, वारसाचे नाव इत्यादी माहिती संस्थेने विहीत नमुन्यात भरुन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय ( तांत्रिक), बुलढाणा, प्रशासकीय इमारत, पहिला माळा, बस स्टँड समोर, बुलढाणा या कार्यालयात स्वहस्ते तातडीने सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## राज्य उत्पादन शुल्कचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे सलग दुसऱ्यांदा ठरले बर्गमॅन किताबाचे मानकरी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क विभागात दुय्यम निरीक्षक या पदावर कार्यरत असलेले रमेश विठोरे यांनी दुसऱ्यांदा बर्गमॅनचा किताब ८ डिसेंबर रोजी कोल्हापूर येथे पटकावला.

ही स्पर्धा ८ डिसेंबर रोजी येथे डेक्कन स्पोर्ट्स क्लबतर्फे आयोजित करण्यात आली होती. यापूर्वीही ९ ऑक्टोबर २०२२ रोजी पुणे येथील डिंभे डॅम येथे विठोरे यांनी हा किताब मिळवला होता. १.९ किलोमीटर पोहणे तसेच ९० किलोमीटर सायकलींग आणि नंतर २१ किलोमीटर धावणे असा हा खडतर प्रवास विठोरे यांनी ७ तास ५० मिनिटांमध्ये पूर्ण करून दुसऱ्यांदा हा किताब मिळवला. विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी भारतातीलच नव्हे तर जगभरातून स्पर्धक सहभागी होतात. जगभरात सर्वात कठीण अशी हाफ आयरनमॅन हे आहे. या स्पर्धेत १.९ किलोमीटर राजाराम तलावात पोहणे, त्यानंतर डोंगराच्या घाट रस्त्यावर ९० किलोमीटर सायकलिंग व तदनंतर लगेचच २१.१ किलोमीटर धावणे अशी ही कठीण स्पर्धा आहे. या स्पर्धेसाठी विठोरे यांनी तब्बल ८ महिने अथक परिश्रम केले. गत २०२२ मध्येही त्यांनी ही स्पर्धा ७ तास ५४ मिनिटांमध्ये पूर्ण केली होती तर यावेळी ७ तास ५० मिनिटात पूर्ण केली. या स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर येथील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अभय देशमुख, आयरनमॅन नितीन घोरपडे तसेच बुलढाणा येथील आयरनमॅन ॲड.शरद राखुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ.पराग मो. नवलकर यांनी तसेच विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मत्स्यव्यवसाय करायचाय? तर कोराडी येथील कोळंबी संवर्धन प्रकल्पाला भेट द्या

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मत्स्यकास्ताकारांना व शेतकऱ्यांना कोळंबी संवर्धनाचे तंत्रज्ञान व त्यासंदर्भात जनजागृती व्हावी व उत्पन्नात वाढ व्हावी याकरीता मेहकर तालुक्यातील कोराडी येथील शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र येथे गोड्यापाण्यातील कोळंबी संवर्धनाचा पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येत आहे. या पथदर्शी कोळंबी संवर्धन प्रकल्पावर इच्छूक मत्स्यकास्तकार व शेतकऱ्यांनी भेट देवून कोळंबी संवर्धनाचे तंत्रज्ञान अवगत करुन घ्यावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) सु.ग.गावडे यांनी केले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात एकूण १०६ पाटबंधारे तलाव, ६२५ जिल्हा परिषद तलाव, ५० ग्रामपंचायत तलाव, जवळपास ५ हजार शेततळी असून मत्स्यव्यसायासाठी एकूण १३८२३.५० हे जलक्षेत्र उपलब्ध आहे. काही मत्स्यव्यसायिक करत असलेल्या गोड्यापाण्यातील कोळंबी संवर्धनाचा अपवाद वगळता यामध्ये बहुतांश मत्स्यकास्तकार हे आपल्या मालकीच्या किंवा ठेक्याने घेतलेल्या तलावात भारतीय प्रमुख कार्प जातीच्या माशांचे मत्स्योत्पादन घेतात. तथापि अशा जलक्षेत्रामध्ये गोड्यापाण्यात वाढणाऱ्या कोळंबीचे भारतीय प्रमुख कार्प जसे कटला, रोहू व मृगल प्रजातींच्या माशांबरोबरच गोड्यापाण्यातील कोळंबीचे संवर्धन केल्यास मत्स्यकास्ताकारांना व शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरु शकेल.

जिल्ह्यातील मत्स्यकास्ताकारांना व शेतकऱ्यांना कोळंबी संवर्धनाचे तंत्रज्ञान व त्यासंदर्भात जनजागृती व्हावी व उत्पन्नात वाढ व्हावी याकरीता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीने कोराडी येथे हा गोड्यापाण्यातील कोळंबी संवर्धनाचा पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येत आहे. या पथदर्शक कोळंबी संवर्धन प्रकल्पावर इच्छूक मत्स्यकास्तकार व शेतकरी यांनी भेट देवून कोळंबी संवर्धनाचे तंत्रज्ञान अवगत करुन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## लोकेशच्या नातेवाईकांनी बालगृहाला संपर्क करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह येथे दाखल असलेल्या आठ वर्षीय लोकेश राजेश जालान याच्या नातेवाईकांनी बालगृह प्रशासनाला संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

बालक नामे लोकेश राजेश जालान, वय ८ वर्ष हा दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी बाल कल्याण समितीच्या आदेशाने शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, बुलढाणा येथे दाखल असून लोकेश हा चिखलीतील संभाजी नगर मधील म्हसोबा मंदीर येथून ताब्यात घेण्यात आला असून सद्यस्थितीत शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, बुलढाणा येथे दाखल आहे. लोकेशला आज रोजी १० महिने पूर्ण झाले असून अद्यापपर्यंत विचारण्यासाठी तसेच बालकाचे कोणीही नातेवाईक सांभाळण्यासाठी किंवा ताबा घेण्यासाठी आलेले नाहीत.

लोकेशला बाल कल्याण समिती, बुलढाणा यांचे कडून पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करण्यासाठी विधी मुक्त करणे आवश्यक असल्याने लोकशचे रक्तसंबंधातील नातेवाईक असल्यास त्यांनी ३० दिवसाच्या आत शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, शरद कला महाविद्यालय कॅम्पस, हाजी मलंग दर्गा मागे, चिखली रोड, बुलढाणा या संस्थेस संपर्क साधावा तसेच शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, बुलढाणा यांना ९२८४८८८२३३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





